RNI No. MAHBIL /2009/35574

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ३९] बुधवार, सप्टेंबर ९, २०२६/भाद्रपद १८, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १०.००

**असाधारण क्रमांक ८३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ कोकण विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमांन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

### जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांजकडून

**जाहीर प्रकटन**

क्रमांक ससाशा/कार्या-१२/जिपपंस निव./उमेदवार निरर्ह/२०२६.—ज्याअर्थी, जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब मा.राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये व आवश्यक केलेल्या रितीने सादर न केल्यास अशा व्यक्तींला आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता सदस्य म्हणून राहण्यास किंवा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास निरर्ह ठरविण्याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १५ ब व ६२ अ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८/का.७ दिनांक २९/०१/२०२६ च्या पत्रानुसार रत्नागिरी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक दिनांक ०७/०२/२०२६ रोजी घेण्यात आली असून निवडणूकीचा निकाल दिनांक ९/०२/२०२६ रोजी जाहिर करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी, उप विभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी, उमेदवारांनी विहित मुदतीत निवडणूक खर्चाचे हिशोब व प्रतिज्ञापत्र विहित केलेल्या पद्धतीने सादर केला नसल्याचे अहवाल या कार्यालयाकडे सादर केले आहेत. त्याअर्थी, उमेदवारांची सुनावणी घेऊन खालील उमेदवारांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ६२अ नुसार सदस्य म्हणून राहण्यास किंवा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास आदेशाचे तारखेपासून ५ वर्षासाठी निरर्ह (Disqualified) ठरविण्यात आले आहे.

| अ. क्र. | तालुका | निरर्ह ठरविलेल्या उमेदवाराचे नांव व पत्ता | निवडणूक लढविलेल्या निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | निरर्ह (Disqualified) ठरविल्याचा आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | दापोली | श्रीम. शुभांगी महादेव खोचरे<br>मु. पो. बोंडिवली, खेर्डी,<br>ता. दापोली, जि. रत्नागिरी | ८ – खेर्डी | क्र.ससाशा/कार्या-१२/जिपपंस निव. खर्च/पं.स.एसआर ०१/२०२६<br>दिनांक १२/०८/२०२६ |
| २ | संगमेश्वर | श्रीम. समिता सतिश कुंभार<br>मु. पो. माखजन, ता. संगमेश्वर,<br>जि. रत्नागिरी | ८०- आरवली | क्र.ससाशा/कार्या-१२/जिपपंस निव. खर्च/पं.स.एसआर ०२/२०२६<br>दिनांक १२/०८/२०२६ |

रत्नागिरी,
दिनांक : १८ ऑगस्ट २०२६.

**मनुज जिंदल,**
जिल्हाधिकारी, रत्नागिरी.

## जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांजकडून

**वाचले .—**

१. जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ६२.

२. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील आदेश क्र.रानिआ/जिपपंस.२०१०/प्र.क्र.९/का-७, दि. १९/११/२०१०.

३. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील आदेश क्रमांक रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का-६, दि. १०/०८/२०१५

४. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील आदेश क्र.रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दिनांक १५/०२/२०२४.

५. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८/का.७, दिनांक २९/०१/२०२६

६. या कार्यालयाकडील नोटीस क्र.ससाशा/कार्या-१२/जिपपंस/निव.खर्च/पं.स. SR.०१/२०२६, दिनांक ०८/०७/२०२६ व दिनांक २३/०७/२०२६.

---

ज्याअर्थी, जिल्हापरिषद व पंचायत समितीची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब मा.राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये व आवश्यक केलेल्या रितीने सादर न केल्यास अशा व्यक्तींला आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता सदस्य म्हणून राहण्यास किंवा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास निरर्ह ठरविण्याबाबत महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ६२ अ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

२. ज्याअर्थी, जिल्हापरिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक उपोद्घातातील अनुक्रमांक ५ च्या पत्रानुसार दिनांक ०७/०२/२०२६ रोजी घेण्यात आली असून सदर निवडणुकीचा निकाल दिनांक ९/०२/२०२६ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे.

३. ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी श्रीमती शुभांगी महादेव खोचरे यांनी ८-खेर्डी या पंचायत समिती गणातून निवडणूक लढविलेली असून त्यांनी विहित मुदतीत निवडणूक खर्चाचे हिशोब विहित केलेल्या पध्दतीने सादर केला नसल्याचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. आणि सदर अहवाल विचारात घेऊन उपोद्घातातील अ.क्र. ६ चे नोटीशीद्वारे श्रीमती शुभांगी महादेव खोचरे यांना उक्त अधिनियमातील उक्त कलमाद्वारे पाच वर्षांसाठी अपात्र का ठरविण्यात येऊ नये याबाबत दिनांक २३/०७/२०२६ व ३०/०७/२०२६ रोजी समक्ष खुलासा सादर करण्याबाबत नोटीस बजावण्यात आलेली होती. त्यांना नोटीस बजाविणेत येवून म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देणेत आलेली होती. परंतु त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केलेले नसलेने त्यांना सदर प्रकरणी स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही. श्रीमती शुभांगी महादेव खोचरे यांनी सदर निवडणुकीत केलेला खर्च विहित नमुन्यात सादर केलेला नसल्याने अथवा निवडणूक खर्च सादर केलेबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नसल्याने त्यांना निरर्ह (Disqualified) ठरविण्यात यावे या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

४. आणि त्यानुसार उपोद्घातातील अनुक्रमांक ४ च्या आदेशान्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी, मनुज जिंदल, जिल्हाधिकारी, रत्नागिरी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

### आदेश

क्रमांक ससाशा/कार्या-१२/जिपपंस निव.खर्च/पं.स.एसआर ०१/२०२६.—श्रीमती शुभांगी महादेव खोचरे यांनी जिल्हापरिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक, २०२६ करिता ८-खेर्डी या पंचायत समिती गणातून निवडणूक लढविणेसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केले होते व निवडणूक लढविलेली आहे. तथापि त्यांनी सदर निवडणूक खर्चाचा हिशोब व प्रतिज्ञापत्र विहित मुदतीत सादर केलेले नसल्याने महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ६२ अ चा भंग झालेला आहे. यास्तव त्यांना

उक्त कलमानुसार सदस्य म्हणून राहण्यास किंवा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास आदेशाच्या दिनांकापासून ५ वर्षांसाठी निरर्ह (Disqualified) ठरविण्यात येत आहे.

सदर आदेश उमेदवारास मान्य नसल्यास त्यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे विशेष अर्ज दाखल करता येईल.

रत्नागिरी,
दिनांक : १२ ऑगस्ट २०२६.

**मनुज जिंदल,**
जिल्हाधिकारी, रत्नागिरी.

## जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांजकडून

**वाचले .—**

१. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ६२.

२. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील आदेश क्र.रानिआ/जिपपंस.२०१०/प्र.क्र.९/का-७, दि. १९/११/२०१०.

३. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील आदेश क्रमांक रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का-६, दि. १०/०८/२०१५.

४. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील आदेश क्र.रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दिनांक १५/०२/२०२४.

५. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांजकडील पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८/का.७, दिनांक २९/०१/२०२६.

६. या कार्यालयाकडील नोटीस क्र.ससाशा/कार्या-१२/जिपपंस/निव.खर्च/पं.स. SR.०२ /२०२६, दिनांक ०८/०७/२०२६.

---

ज्याअर्थी, जिल्हापरिषद व पंचायत समितीची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब मा.राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये व आवश्यक केलेल्या रितीने सादर न केल्यास अशा व्यक्तींला आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता सदस्य म्हणून राहण्यास किंवा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास निरर्ह ठरविण्याबाबत महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ६२ अ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

२. ज्याअर्थी, जिल्हापरिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक उपोद्घातातील अनुक्रमांक ५ च्या पत्रानुसार दिनांक ०७/०२/२०२६ रोजी घेण्यात आली असून सदर निवडणुकीचा निकाल दिनांक ९/०२/२०२६ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे.

३. ज्याअर्थी, तहसीलदार, संगमेश्वर यांनी श्रीमती समिता सतिश कुंभार यांनी ८०-आरवली या पंचायत समिती गणातून निवडणूक लढविलेली असून त्यांनी विहित मुदतीत निवडणूक खर्चाचे हिशोब विहित केलेल्या पध्दतीने सादर केला नसल्याचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. आणि सदर अहवाल विचारात घेऊन उपोद्घातातील अ. क्र. ६ चे नोटीशीद्वारे श्रीमती समिता सतिश कुंभार यांना उक्त अधिनियमातील उक्त कलमाद्वारे पाच वर्षासाठी अपात्र का ठरविण्यात येऊ नये याबाबत दिनांक २३/०७/२०२६ रोजी समक्ष खुलासा सादर करण्याबाबत नोटीस बजावण्यात आलेली होती. त्यांना नोटीस बजाविणेत येऊन म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देणेत आलेली होती. त्यांनी दिनांक २३/०७/२०२६ रोजी त्यांचे म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी घरगुती अडचणीमुळे निवडणूक खर्च केलेला नसून आपल्याकडे सादर करु शकत नाही असे नमूद केले आहे. सदरचे कारण हे योग्य वाटत नाही. त्यामुळे त्यांना निरर्ह (Disqualified) ठरविण्यात यावे या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

४. आणि त्यानुसार उपोद्घातातील अनुक्रमांक ४ च्या आदेशान्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी, मनुज जिंदल, जिल्हाधिकारी, रत्नागिरी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

### आदेश

क्रमांक ससाशा/कार्या-१२/जिपपंस निव.खर्च/पं.स.एसआर०२/२०२६.—श्रीमती समिता सतिश कुंभार यांनी जिल्हापरिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक, २०२६ करिता ८०-आरवली या पंचायत समिती गणातून निवडणूक लढविणेसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केले होते व निवडणूक लढविलेली आहे. तथापि त्यांनी सदर निवडणूक खर्चाचा हिशोब व प्रतिज्ञापत्र विहित मुदतीत सादर केलेले नसल्याने महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ६२ अ चा भंग झालेला आहे. यास्तव त्यांना उक्त कलमानुसार सदस्य म्हणून राहण्यास किंवा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास आदेशाच्या दिनांकापासून ५ वर्षांसाठी निरर्ह (Disqualified) ठरविण्यात येत आहे.

सदर आदेश उमेदवारास मान्य नसल्यास त्यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे विशेष अर्ज दाखल करता येईल.

रत्नागिरी,
दिनांक : १२ ऑगस्ट २०२६.

**मनुज जिंदल,**
जिल्हाधिकारी, रत्नागिरी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.